
CCPS Center for Chemical Process Safety — An AIChE Technology Alliance
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon — १० वा वर्धापन दिन
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# झाकणे आणि बूच – एक दिवस तुम्हाला त्यांची उणीव भासेल!

डिसेंबर २०११



कामगार व सामग्रींसाठी बांधलेल्या तात्पुरत्या परांचीवरून दगडविटांचा एक तुकडा खाली पडला. तो नेमका एका मोठ्या रसायन वाहीनीच्या व्हेंटवरील एक चतुर्थांश उघडणाऱ्या पाऊण इंची (सुमारे 20 मिमि) बॉल व्हॉल्व्हवर पडला. त्यामुळे तो बॉल व्हॉल्व्ह उघडला. मोठ्या रसायन वाहीनीत असलेला ज्वालाग्राही पदार्थ व्हेंटमधून बाहेर आला. परिणत आगीमध्ये एक कंत्राटी कामगार ठार झाला तर अन्य दोघे गंभीररित्या भाजले.

ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी रसायन वाहीनीच्या व्हेंट लाइनवर झाकण किंवा बूच नव्हते. एक चतुर्थांश उघडणारा बॉल व्हॉल्व्ह ही एकच गोष्ट ज्वालाग्राही पदार्थाची घातक प्रमाणातील गळती रोखणारी होती.

ही घटना घडली कारण व्हॉल्व्हवर काहीतरी पडले आणि तो उघडला गेला. अन्य दुसऱ्या मार्गाने व्हॉल्व्ह गळका झाला असेल किंवा अपघाताने उघडला गेला असेल असे तुम्हाला वाटते का?

## आपणास माहीत आहे?

- घातक पदार्थ आणि पर्यावरण किंवा कार्यस्थळ यांमध्ये एकापेक्षा जास्त अडसर असावेत. गळक्या किंवा अपघाताने उघडलेल्या व्हॉल्व्हची परीणती घातक पदार्थाच्या प्रसारणामध्ये होऊ नये.
- व्हेंट, ड्रेन किंवा प्रक्रीयेतील पाइपलाइन्सवरील झाकणे किंवा बूच परत लावणे सहज विसरले जावू शकते. सहसा झाकणे किंवा बूच काढणारी व्यक्ति मागाहून येवून परत बसविणार असतो पण प्रक्रीया उद्योगातील प्रत्येकजण व्यग्र असतो आणि विसरू शकतो.
- अगदी लहानशा पाइपमधूनही ज्वालाग्राही किंवा विषारी अशा घातक पदार्थांचे धोकादायक उत्सर्जन होऊ शकते.

## आपण काय करू शकता?

- व्हेंट पाइप्स, ड्रेन पाइप्स सॅम्पलींग यांच्यावरील झाकणे आणि बुच किंवा अन्य ठिकाणी काम करताना जिथे तुम्हाला झाकणे आणि बुच काढावी लागतात ती नेहमी परत लावावीत. जोपर्यंत हाती आलेले उपकरण पूर्ववत होत्या त्या स्थितीत येईपर्यंत तुमचे काम पूर्ण होत नसते.
- तुमच्या संयंत्रातील पाइप जोडणींवरील गहाळ झालेली झाकणे आणि बुच शोधून काढा, ती दुरूस्त किंवा बदलली गेल्याची खात्री करा.
- काही व्हेंट व्हॉल्व्ज हे उघडेच (झाकण आणि बुच न लावता) ठेवायचे असतात हे विसरू नका. उदाहरणार्थ – ————————————————. for example the vent on a double block and bleed isolation. एखाद्या ठिकाणी झाकण किंवा बुच लावण्याच्या आवश्यकतेबाबत साशंक असाल तर पाइपिंगच्या डिझाइनमधील माहीतगार व्यक्तिचा सल्ला घ्या.
- ज्या ठिकाणचा व्हॉल्व्ह गळका झाल्यास किंवा अपघाताने उघडल्यास धोकादायक पदार्थ अथवा दाब उत्सर्जित होऊ शकतो अशी ठिकाणे शोधा. त्यांची माहिती द्या आणि काही ना काही आधार असल्याची खात्री करा जसे – झाकण, बूच, ब्लाइंड किंवा विलग करणारा अतिरिक्त व्हॉल्व्ह
- व्हेंट किंवा ड्रेन पाइप्सवरील व्हॉल्व्जच्या हॅंडल्स उलटसुलट ठेवा ज्यामुळे त्यावर वाकल्यास किंवा भार दिल्यास ते अनवधानाने उघडणार नाहीत.
- एक चतुर्थांश उघडणाऱ्या बॉल किंवा प्लग व्हॉल्व्हच्या ऐवजी डायफ्रॅम, ग्लोब किंवा गेट व्हॉल्व्हसारख्या अपघाताने सहज न उघडला जाणाऱ्या व्हॉल्व्जच्या वापराबाबत विचार करा.
- व्हेंट किंवा ड्रेन पाइप्सवरील कोणतेही बदल करण्यापूर्वी बदल व्यवस्थापन आढावा घेतला असल्याची खात्री करा.

***एखादा बिघाड गंभीर दुर्घटनेचे कारण बनू देवू नका!***

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मलय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.
This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.